**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण,२०१२**
**राज्यातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील (National games) पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख पारितोषिक देवून गौरविण्याची योजना**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो- १२१६ /प्र.क्र.५४/१२/क्रीयुसे-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीख: ०८ जानेवारी, २०१८.

वाचा:-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीडाधो-२०११/ प्र.क्र.५५/११/ क्रीयुसे-१, दिनांक १४ जुन २०१२.
२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीडाधो-२०१२/ प्र.क्र.१५८/१२/ क्रीयुसे-२, दिनांक ५ फेब्रुवारी,२०१४.

**प्रस्तावना :-**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण,२०१२ घोषित करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी करण्यास संदर्भ् क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या राज्यातील खेळाडूंना व त्यांच्या मार्गदर्शकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्याची योजना संदर्भिय क्र २.च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. सदर योजना तयार करताना उदयोन्मुख व सातत्याने विकसीत होत जाणा-या खेळाडूंना भरीव मदत देणेसाठी उपाययोजना करणेचे दृष्टीने अर्थिक मदतीचे निकष ठरविणेत आलेले आहेत. याच धर्तीवर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदकप्राप्त खेळाडूंना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यासाठी धोरण आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या प्रस्तावास मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे.

**शासन निर्णय:-**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत (National games) उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या राज्यातील खेळाडूंना व त्यांच्या मार्गदर्शकांना सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील नियमावलीनुसार प्रोत्साहनपर रोख बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यातील खेळाडूने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकप्राप्त केल्यानंतर त्याबाबतची माहिती संबंधित एकविध खेळाच्या राज्य संघटनेने, पदक प्राप्तीच्या प्रमाणपत्रासह, आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्याकडे १५ दिवसाच्या कालावधीत देण्याची व्यवस्था करावी. याशिवाय सदर स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडूंची अद्ययावत माहिती प्रसारमाध्यमांद्वारे तसेच इंटरनेटद्वारे उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी आयुक्त, क्रीडा व युवकसेवा यांनी क्रीडा व युवकसेवा संचालनलायातील जबाबदार अधिकाऱ्याकडे सोपवावी.

३. स्पर्धेमध्ये पदक प्राप्त केलेल्या राज्यातील खेळाडूची माहिती प्राप्त झाल्यावर त्या खेळाडूस राज्य शासनाच्यावतीने अभिनंदन करणारे पत्र आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्या स्वाक्षरीने आठ दिवसाच्या कालावधीत पाठविण्यात यावे व त्या पत्राची प्रत शासनास पाठविण्यात यावी.

४. या शासन निर्णयातील तरतूदी केरळ येथे पार पडलेल्या ३५ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूस व त्यानंतर होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील (National games) पदक विजेत्या खेळाडूस लागू राहतील.

५. खेळाडूंना रोख पारितोषिक देण्याच्या योजनेकरिता होणारा खर्च “२२०४-क्रीडा व युवकसेवा (०९)(०६) ऑलिम्पिक, राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धांमधील पदक विजेत्यांना रोख पारितोषिके देणे (२२०४-५३२१)- ५० इतर खर्च” या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा.

६. हा शासन निर्णय सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९१५/२०१७/व्यय-५,दि.०३.११.२०१७ नुसार देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०८१६३१५६५५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d47 55ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.01.08 16:37:42 +05'30'

**(राजेंद्र पवार)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे विभाग, पुणे
३. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई,
४. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०२१.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
८. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
९. मानद महासचिव, सचिवालय जिमखाना, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
१०.संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालये (सचिवालय जिमखान्यामार्फत)
११.निवड नस्ती (क्रीयुसे-२).

**: परिशिष्ट "अ":**

शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो- १२१६ /प्र.क्र.५४/१२/क्रीयुसे-२, दिनांक: ०८ जानेवारी, २०१८. चे सहपत्र

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण,२०१२ राज्यातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील (National games) पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख पारितोषिक देवून गौरविण्याची योजना.

नियम १:- शीर्षक :- या नियमांना राज्यातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याच्या योजनेचे नियम, २०१८ असे संबोधण्यात यावे.

नियम २ :- उद्दिष्ट :- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या राज्यातील खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना प्रोत्साहनपर बक्षिस देऊन त्यांचा गौरव करणे व त्यांना प्रोत्साहीत करणे.

नियम ३ :- पुरस्काराचे स्वरुप:- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदकप्राप्त केलेल्या खेळाडूंना व त्यांच्या मार्गदर्शकांना त्यांच्या कामगिरीनुसार खालीलप्रमाणे रोख पारितोषिक देण्यात येईल :-

| **राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम** (रु.लाखात) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सुवर्ण पदक | | रौप्य पदक | | कांस्य पदक | |
| खेळाडू | मार्गदर्शक | खेळाडू | मार्गदर्शक | खेळाडू | मार्गदर्शक |
| ५.०० | ०.५० | ३.०० | ०.३० | १.५० | ०.२० |

नियम ४ :- पात्रतेचे निकष :-

I. खेळाडूचे / मार्गदर्शकाचे महाराष्ट्रात सलग १५ वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे.
II. क्रीडा मार्गदर्शकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देताना संबंधित खेळाडूंच्या मूळ क्रीडा मार्गदर्शकाचा असावा. सदर क्रीडा मार्गदर्शक हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. तसेच पुरस्कार्थी खेळाडूंने त्याच्या मूळ क्रीडा मार्गदर्शकाचे नाव स्वत: प्रमाणित करुन देणे आवश्यक आहे.

नियम :-५ :- रोख पारितोषिक मंजूर करण्याचे अधिकार :- खेळाडूच्या कामगिरीची पडताळणी नियम ३ नुसार करुन संबंधित खेळाडूस रोख पारितोषिक मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवकसेवा यांना राहतील.

नियम :-६ :- आहरण व संवितरण अधिकारी :- या योजनेसाठी आयुक्त, क्रीडा व युवकसेवा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

निमय :- ७ :- नियम शिथिल करणे / बदल करणे :- या नियमावलीमधील कोणताही नियम शिथिल करणे, त्यात अशंत: किंवा पूर्णत: बदल करणे, नवीन नियम समाविष्ट करणे याबाबतचे सर्व अधिकार शासनास राहतील.

.........................